महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र. मआ/झोनिपु/८२
दि. 9 MAY 2013

# आज्ञापत्र

विषय – ''गलिच्छ वस्ती '' या शब्दाऐवजी ''झोपडपट्टी'' असा शब्दप्रयोग करणे व गलिच्छ वस्ती निर्मुलन विभागाचे नाव ''झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग'' असे करणेबाबत.

संदर्भ – १) क्र. गवसू१०८९/सीआर–२२९७/का.–७ गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई – ३२ दि. ६/१/१९९०.

महाराष्ट्र शासनाने दिलेल्या उपरोक्त संदर्भांकित पत्रातील निर्देशानुसार ''गलिच्छ वस्ती'' या शब्दप्रयोगा ऐवजी शासकिय कामकाजात ''झोपडपट्टी'' या शब्दाचा वापर करणे आवश्यक आहे. तथापि पुणे महानगरपालिकेत गलिच्छ वस्ती निर्मुलन विभाग कार्यरत असुन झोपडपट्टी पुनर्वसन अधिनियमाच्या तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांना सक्षम प्राधिकारी (ग.व.नि.) तर खातेप्रमुख उपआयुक्त यांना उपआयुक्त (ग.व.नि.) म्हणून संबोधले जाते.

शासनाकडील निर्देशांचा विचार करून यापुढे ''गलिच्छ वस्ती '' हा शब्दप्रयोग न वापरता या शब्दप्रयोगा ऐवजी ''झोपडपट्टी'' असा शब्दप्रयोग करणे आवश्यक आहे. त्यामुळे ''गलिच्छ वस्ती निर्मूलन'' खात्याचे नाव यापुढे ''झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग'' असे करणेत येत आहे. तसेच यापुढे या विभागात किंवा या विभागाशी सबंधित अन्य कामकाज करताना पदनामासमोर ''झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग'' (झोनिपु) असे नमुद करणे अनिवार्य राहील.

09/05/2013

महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत –

१. अति. महापालिका आयुक्त (विशेष), पुणे महानगरपालिका.
२. अति. महापालिका आयुक्त (जनरल), पुणे महानगरपालिका.
३. अति. महापालिका आयुक्त (इस्टेट), पुणे महानगरपालिका.

यांजकडेस माहितीसाठी

४. उपआयुक्त, झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग, पुणे महानगरपालिका.
५. सह. महापालिका आयुक्त/उपआयुक्त, विभागीय कार्यालय क्र. १ ते ४
६. सर्व खातेप्रमुख, पुणे महानगरपालिका

यांना आज्ञापत्रकाप्रमाणे कार्यवाहीसाठी रवाना.

सांख्यिकी व संगणक कार्यालय
पुणे महानगरपालिका
आवक क्र. ८४८
दिनांक :- ९/५/१३